क्रमांक १७७६१ क-३(लेखा)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन मुंबई- ४०००३२
दिनांक १९ ऑक्टोबर, २०२६

: परिपत्रक :

विषय : नवीन सेवार्थ प्रणाली (ई-वेतनसेवा) अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने अधिकारी/कर्मचाऱ्यांची अद्ययावत सेवा तपशिलाची माहिती संकलित करण्याबाबत

संदर्भ : (१) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/ कोषा प्रशा.४ दिनांक ०१/०४/२०२६.

(३) परिपत्रक क्र. अले/नियंत्रण/र.का २/ न.क्र (३)/ परि-८५/ दिनांक २९/९/२०२६.

(३) शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/कोषा प्रशा-४ दिनांक १४/१०/२०२६

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकान्वये नवीन सेवार्थ प्रणाली (ई-वेतनसेवा) अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई अधिनस्त आहरण व संवितरण अधिकारी यांच्याकरिता लागू करण्याचे आदेशित करण्यात आले आहे. सदर अंमलबजावणी वेगाने व सुलभरित्या व्हावी याकरिता सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांची माहिती अद्ययावत करावयाची आहे.

यास्तव या सचिवालयात नवीन सेवार्थ प्रणाली कार्यान्वित करण्याकरिता उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकान्वये सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांची अद्ययावत माहिती संकलित करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने या परिपत्रका सोबत जोडण्यात आलेले सेवा तपशिल विवरणपत्र या सचिवालयाच्या **https://mls.org.in/account/index.html** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून सर्व कक्ष अधिकारी किंवा संबंधित कक्षाचे अधिकारी यांनी आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचेकडून सदर फार्म Online व Offline भरुन क-३ लेखा शाखेत दिनांक २१ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत पाठविण्यात यावी ही विनंती. जेणेकरुन सदर माहिती नवीन सेवार्थ मध्ये Upload करुन पुढील कार्यवाहीकरिता अधिदान व लेखा कार्यालयास सादर करण्यात येईल व ऑक्टोबर २०२६ चे वेतन दिवाळी पूर्वी पारित करणे शक्य होईल.

(नयना चव्हाण)
कक्ष अधिकारी तथा
आहरण व संवितरण अधिकारी
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति :-

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय.

२) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.

३) मा.उप सभापती महाराष्ट्र विधानपरिषद यांचे कार्यालय.

४) मा.उपाध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांचे कार्यालय.

५) सचिव (१) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

६) सचिव (२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सचिव (३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) सचिव (४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय सर्व अधिकारी.

११) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयतील सर्व कक्ष

१३) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१४) कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१५)"क-२" (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१६) निवडसूची

१७) संगणक कक्ष